महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं/उसप २०२६- २७/पाच/ 1644 दिनांक : 09 SEP 2026

वाचावे : १) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र.कशिमं/उसप २०२५- २६/पाच/ E-३४२९०५६, दिनांक ०८.०९.२०२६
२) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र.कशिमं/उसप २०२५- २६/पाच/ E-३४२८२९६, दिनांक ०८.०९.२०२६

परिपत्रक

विषय : <u>उच्चकला द्वितीय व तृतीय सत्र परीक्षा (शैक्षणिक वर्ष २०२६-२७)</u>
कला परिसंस्थांची नोंदणी/ अद्ययावत माहिती, विद्यार्थ्यांची नोंदणी/
परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क ऑनलाईन सादर करणेबाबत.

उपरोक्त वाचावे येथील संदर्भिय क्र. १ व २ वरील परिपत्रकान्वये कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या माहे, ऑक्टोबर, २०२६ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या अनुक्रमे **द्वितीय सत्र (Semester II)** व **तृतीय सत्र (Semester III)** परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

०२. प्रस्तुत परीक्षेच्या अनुषंगाने सर्व संलग्न कला परिसंस्थांना कळविण्यात येते की, सदर परीक्षेकरिता आपल्या कला परिसंस्थेची ऑनलाईन नोंदणी/अद्ययावत माहिती भरुन **द्वितीय सत्र (Semester II)** परीक्षेस पूर्नप्रविष्ठ (Repeater) होणाऱ्या विद्यार्थ्यांचे तसेच **तृतीय सत्र (Semester III)** परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या नियमित (Reguler) विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क **https://hae.semesterpattern.msbae.in** या लिंकवर खालील नमूद कालावधीत ऑनलाईन सादर करावे.

अ.क्र.	तपशील	कालावधी
१	कला परिसंस्थांची नोंदणी/माहिती अद्ययावत करणे	दि.१०.०९.२०२६ ते दि.१२.०९.२०२६
२	विद्यार्थी नोंदणी/परीक्षा आवेदनपत्र सादर करणे (कला परिसंस्थेमार्फत)	दि.१०.०९.२०२६ ते दि.२३.०९.२०२६
३	परीक्षा शुल्क भरणे (कला परिसंस्थेमार्फत)	दि.१०.०९.२०२६ ते दि.२४.०९.२०२६

०३. सत्र परीक्षेची उपरोक्त लिंक कला शिक्षण मंडळाच्या **https://msbae.ac.in** या संकतेस्थळावर Higher Art Exam या मेनूमधील Higher Art Examination (Semester Pattern) २०२६-२७ या टॅबमध्येही उपलब्ध करुन देण्यात आली आहे. परीक्षा आवेदनपत्रे व परीक्षा शुल्क ऑनलाईन सादर करण्यास कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही. त्यामुळे, विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क विहित कालावधीत सादर करण्याची तसेच कोणताही पात्र विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांची राहील. वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याकरिता लागणारे गोपनीय Username व Password कला परिसंस्थेचे प्रमुख (कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य) यांना त्यांच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर/ई-मेलवर यापूर्वीच उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

०४. द्वितीय व तृतीय सत्र परीक्षेसाठी लागणारे साहित्य कला परिसंस्थांनी विद्यार्थी संख्येनुसार विहित कार्यपध्दीचा अवलंब करुन आपल्या स्तरावर खरेदी करावे व यासाठी होणारा खर्च विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येणाऱ्या एकुण परीक्षा शुल्काच्या ३०% रकमेतून भागविण्यात यावा व उर्वरीत ७०% परीक्षा शुल्क कला शिक्षण मंडळाकडे ऑनलाईन भरणा करावे. याबाबतचे विवरणपत्र सोबत जोडले आहे. त्यानुसार, कला परिसंस्थांनी पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

(स्मिता किंकळे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई

प्रति,

१) कुलसचिव, सर ज.जी. कला, वास्तुकला व अभिकल्प विद्यालय, मुंबई
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
४) प्राचार्य, शासनमान्य अशासकीय कला परिसंस्था. (मंडळाशी संलग्नित)

प्रत,

१) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.
२) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर
४) सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
५) निवड नस्ती.

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई

शासकीय उच्चकला परीक्षा (Semester Pattern)

शैक्षणिक वर्ष २०२६-२७

<u>परीक्षा शुल्काचे विवरणपत्र</u>

अ.क्र.	अभ्यासक्रम	कला परिसंस्थांनी विद्यार्थ्यांकडून जमा करावायाचे परीक्षा शुल्क (प्रती विद्यार्थी) (रु.)	कला परिसंस्थांनी परीक्षेचे साहित्य खरेदी करण्यासाठी जमा परीक्षा शुल्कातून कपात करावयाचे प्रती विद्यार्थी परीक्षा शुल्क (३०%) (रु.)	कला शिक्षण मंडळाकडे ऑनलाईन भरणा करावयाचे प्रती विद्यार्थी परीक्षा शुल्क (७०%) (रु.)
१	फाऊंडेशन सर्टिफिकेट इन आर्ट अॅन्ड डिझाईन	४००	१२०	२८०
२	कला शिक्षक पदविका	६००	१८०	४२०
३	कला शिक्षणशास्त्र पदविका	९००	२७०	६३०
४	आर्ट मास्टर प्रमाणपत्र	६००	१८०	४२०
५	रेखा व रंगकला पदविका	८००	२४०	५६०
६	उपयोजित कला पदविका	८००	२४०	५६०
७	शिल्पकला व प्रतिमानबंध पदविका	८००	२४०	५६०
८	वस्त्रकला पदविका (प्रिंटींग अॅन्ड डाईंग)	८००	२४०	५६०
९	वस्त्रकला पदविका (विव्हींग)	८००	२४०	५६०
१०	अंतर्गत गृह सजावट पदविका	८००	२४०	५६०

(स्मिता किंकळे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई.